Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**Date :** 08/03/2021 **Receipt No. :** 12

Received Rs. 100/- (Cash/Cheque/Google Pay/ Net Banking)

(in words) one Hundred only

from the participant Dhanashri Suhasini

of the College / University Sociology, RCSC, Kolhapur

for the National Seminar on **8th March 2021** on **'Understanding Transgender (LGBTQAI) for Inclusive Society'**

Mob. No. ______

| Rs. | 100/- |
|---|---|

**Receiver's Signature**

Indian Council of
Social Science Research

SPONSORED"

A NATIONAL SEMINAR
ON

**UNDERSTANDING TRANSGENDER
(LGBTQAI) FOR INCLUSIVE SOCIETY**

Organized by

**Sansthamata Sushiladevi Salunkhe
Centre of Women's Studies
&
IQAC**

Knowledge Partner

**Abhiman, Kolhapur**



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

कोल्हापूर

NAAC Reaccredited 'A'
with CGPA-3.24 ( in 3rd cycle)

ISSN : -2581-8848

# VIVEK
# RESEARCH JOURNAL

**A Biannual Peer reviewed National Journal of Multi Disciplinary Research Articles**

A Special Issue on

Indian Council of
Social Science Research
**SPONSORED**

**A NATIONAL SEMINAR
ON**

**UNDERSTANDING TRANSGENDER
(LGBTQAI) FOR INCLUSIVE SOCIETY**

**8th March, 2021**

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | Women Empowerment: A Study of International Conventions on Human Trafficking | Dr. Pramod P. Waghmare | 170-176 |
| 27 | Awareness of Gender Equality Among B.Ed. Student-Teachers | Dr. Mahadeo Vishnu Mate | 177-180 |
| 28 | महिला सबलीकरण सद्यस्थिती | डॉ. शुभांगी एस. माने | 181-187 |
| 29 | कोल्हापूर शहरातील महिला सक्षमीकरणाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ: जाधववाडी प्रभाग | धनश्री विश्वास सुरवसे<br>डॉ. कन्नाडे एम. के. | 188-191 |
| 30 | The Global Nature of Slavery And Women: A Historical Review | Mr. Mansing Vitthal Thombare | 192-195 |
| 31 | Role of ICT In Women Empowerment | Prof. Ahilya P. Patil | 196-204 |
| 32 | तीसरी दुनिया की परतें खोलती कहानियाँ: *तीसरी ताली* | डॉ. आरिफ शौकत महात | 205-213 |

 ISSN-2581-8848

## कोल्हापूर शहरातील महिला सक्षमीकरणाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ: जाधववाडी प्रभाग

**धनश्री विश्वास सुरवसे**

समाजशास्त्र विभाग (संशोधक विद्यार्थिनी)

**डॉ. कन्नाडे एम. के.**

रा. छ. शाहू कॉलज, कोल्हापूर

**गोषवारा :** मानव समाजात जवळपास पन्नास टक्के प्रमाण स्त्रियांची आहे आज स्त्री शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, क्षेत्रात पुरूषाच्या खांद्याला खांदा देऊन काम करताना दिसते. स्त्रीने स्वतःच्या कष्टाने कर्तुत्वाने आणि आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर समाजात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. आज सर्व क्षेत्रात स्त्री पुरुषाच्या बरोबरीने आघाडीवर असली तरी ते फक्त ठराविक वर्गापुरतेच मर्यादित आहे.

**उद्देश :**

- महिला सक्षमीकरणाच्या इतिहासाचा अभ्यास करणे
- सद्यस्थितील महिलांच्या स्थितीचा अभ्यास करणे

महिला सक्षमीकरण ही एक व्यापक प्रक्रिया आहे. महिलांचे सक्षमीकरण म्हणजे समाजाचा, देशाचा विकास असतो. समाज परिवर्तनशील आहे त्याप्रमाणे स्त्रियांची भूमिका, महत्त्वाकांक्षा, दृष्टिकोण यामध्ये बदल होत आहे. भारताच्या पुरुष प्रधान संस्कृतीत महिलांकडे, त्यांच्या अधिकाराकडे, व्यक्ती स्वातंत्र्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात आज फरक झालेला दिसतो. पण त्याची व्यापकता वाढणे आवश्यक आहे. भारतीय संविधानाने दिलेले मुलभूत हक्क आणि अधिकार हा स्त्रियांच्या विकासाचा पाया आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी मुलींची शैक्षणिक, व्यावसायिक योग्यता वाढवणे आवश्यक आहे. याशिवाय राजकीय अधिकाराशिवाय कोणत्याही घटकाला सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम होता येत नाही. त्यामुळे स्त्रियांना राजकीय हक्क मिळण्यासाठी राजकारणात 50 टक्के आरक्षण मिळणे आवश्यक आहे. महिला समाजव्यवस्थेचा अविभाज्य व अनिवार्य भाग आहे. तेव्हा त्यांना सर्वार्थाने सक्षम करणे हे समाज, शासन व स्वतः महिलांचे प्रथम कर्तव्य आहे.

**प्रस्तावना :** मानव समाजात जवळपास पन्नास टक्के प्रमाण स्त्रियांची आहे आज स्त्री शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, क्षेत्रात पुरूषाच्या खांद्याला खांदा देऊन काम करताना दिसते. स्त्रीने स्वतःच्या कष्टाने कर्तुत्वाने आणि आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर समाजात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. आज सर्व क्षेत्रात स्त्री पुरुषाच्या बरोबरीने आघाडीवर असली तरी ते फक्त ठराविक वर्गापुरतेच मर्यादित आहे.

**महिला सक्षमीकरण संकल्पना:** महिला सक्षमीकरण म्हणजे कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रामध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे, विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे तसेच स्वतःच्या क्षमतांची ओळख करून घेऊन त्याचा विकास करायचा तसेच घरगुती आणि सामाजिक निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण म्हणतात.

**महिला सक्षमीकरणाचा इतिहास:** आज समाजाचा विकास झाला असे आपण मानत असलो तरी त्याला साक्ष असणाऱ्या इतिहासाला आपण विसरू शकत नाही. आज पर्यंत इतिहासाचा आपण आढावा घेतला तर 'स्त्री' ही राष्ट्रउभारणीच्या चळवळीचा अविभाज्य घटक आहे अशीच तिची ओळख राहिली.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षण+ समता +न्याय = सक्षमीकरण अशाच स्वरूपाचे विचार मांडलेले पहावयास मिळते.

महिला सक्षमीकरणाआ मध्ये डॉ. बाबासाहेबांचे योगदान तर अतिशय महत्वाचे आहे. त्यांनी स्त्रियांना हिंदू कोड बिला द्वारे न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

इतिहासा पासून ते आजपर्यंत महिला सक्षमीकरणाचे आयाम सतत बदलत असलेले दिसून येतात. कारण येथे आपणास स्त्रियांची बहुविविधता पहावयास मिळते. आदिवासी, दलित, उच्चभ्रू आणि उच्चशिक्षित महिलांच्या सक्षमीकरणाची स्थिती ही भिन्नभिन्न स्वरूपाची आहे.